


दैनिक
निळे प्रतिक




• दैनिक • छत्रपती संभाजीनगर • वर्ष-१ • अंक - १६८ • बुधवार, दि. २० नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • किंमत ५ रूपये

# मी कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा दिलेला नाही, भदंत विशुद्धानंद बोधी महास्थवीर

## समाजाची माफी मागत राजकीय पाठिंब्यावरील वक्तव्य घेतले मागे

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**



औरंगाबाद बौद्ध लेणीचे प्रमुख भिक्षू भदंत विशुद्धानंद बोधी महाथेरो यांनी एमआयएम आणि शिवसेना उमेदवारांना पाठिंबा दर्शविणाऱ्या व्हिडिओ क्लिपमुळे निर्माण झालेल्या वादावर आपले तिसरे स्पष्टीकरण दिले आहे. समाजाच्या तीव्र प्रतिक्रिया आणि टीकांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपला कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसल्याचे पुन्हा जाहीर केले आहे.

**पहिल्या दोन व्हिडिओ क्लिप्समुळे वाद** – एमआयएम उमेदवाराला पाठिंबा असल्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर लगेचच शिवसेनेचे उमेदवार संजय शिरसाठ यांना पाठिंबा असल्याचा दुसरा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या घटनांनी आंबेडकरी समाजात तीव्र संताप निर्माण केला. समाज माध्यमांवर भदंत विशुद्धानंद यांच्यावर जोरदार टीका सुरू झाली.

**तिसऱ्या व्हिडिओत स्पष्टीकरण** – बुद्धगयेतून आपल्या तिसऱ्या व्हिडिओद्वारे भदंत महाथेरो म्हणाले: 'नमो बुद्धाय, सप्रेम जयभीम. मी कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा दिलेला नाही. काही लोकांनी माझे व्हिडिओ इमोशनल करून बनवले आणि व्हायरल केले. मी कोणालाही मतदान करण्याचे सुचवले नाही. बाबासाहेबांनी दिलेल्या स्वातंत्र्यानुसार प्रत्येकाने आपला निर्णय घ्यावा. मी सर्वांना समान आशीर्वाद देणारा भिक्षू आहे.' भदंत विशुद्धानंद यांच्यावर टीका आणि मागणी. समाजात अनेकांनी याप्रकरणी नाराजी व्यक्त केली आहे. पूर्वी बौद्ध लेणी बचाव आंदोलनातही भदंतांना आपले वक्तव्य मागे घ्यावे लागले होते.

'भिक्षू म्हणून समाजाकडून भदंत महाथेरो यांच्याकडून अधिक जबाबदारीची अपेक्षा आहे. त्यांनी वक्तव्य करताना विचारपूर्वक बोलावे. माफी मागण्याची वेळ टाळण्यासाठी भदंतांनी संयम आणि समंजसपणाने निर्णय घ्यावा,' अशी मागणी समाजातून पुढे येत आहे.

**समाजाची भूमिका** – या संपूर्ण प्र'कारामुळे आंबेडकरी समाजाने पुन्हा एकदा आपल्या धर्मगुरूंनी राजकीय वक्तव्यांपासून दूर राहण्याची गरज व्यक्त केली आहे. भदंत विशुद्धानंद बोधी महाथेरो यांनी त्यांच्या तिसऱ्या व्हिडिओत दिलेल्या स्पष्टीकरणामुळे वाद शमण्याची शक्यता आहे, मात्र भविष्यात विचारपूर्वक वर्तनाची मागणी जोर धरत आहे.

# ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांचे अविस्मरणीय भाषण!

**सोमवार** दि. १८ /११/ २०२४ ला ॲड बाळासाहेब आंबेडकर यांनी अकोट विधानसभेचे उमेदवार दीपक रामदासजी बोडखे यांच्या प्रचारार्थ जे भाषण केले ते भाषण तरुणांनाच नव्हे तर ८०-८५ वर्षाच्या म्हातार्‍याला सुद्धा फार मोठी ऊर्जा देऊन गेले!

आणि तो ऊर्जा स्त्रोत इतका भयानक होता की त्याची कल्पनाच केलेली बरी. मला वाटते, त्या भाषणाने वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमधे नवी प्रेरणा, नवी चेतना व अपार कष्ट करण्याची इच्छाशक्ती जागृत झालीच असेल यात तीळ मात्र शंका नाही! कारण की, खरोखर एड. बाळासाहेबांचा तो आवाज, आवाजच नव्हता तर ती एक सिंहाची दहाड होती ती दहाड प्रस्थापितांच्या छातीला फोडून टाकणारी तर होतीच परंतु ती बुलंद गर्जना म्हणजे अक्षरश: सजीवातील ओबीसी व मुस्लिम बांधवांसाठी ७० वर्षा पासूनच्या बेमालूमपणे आलेल्या चिरनिंद्रिला तोडून टाकणारे आवाहन होते! त्यामुळे

मला वाटते हे आवाहण स्वीकारून जर ओबीसी व मुस्लिम बांधवांनी आपल्या येणाऱ्या पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी वंचित बहुजन आघाडीला विजय केले तर ते फार मोठे केलेले कार्य असेल! कारण की २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला मिळालेल्या विजयाच्या मार्गानेच आरक्षणाचे शिखर गाठता येऊ शकते! हेच इथे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे!

परंतु यावेळी जर चुकून भुलून मुस्लिम आणि ओबीसी बांधवांनी थोडीशी चूक केली तर समजून चालायचं की त्यांच्या येणाऱ्या नवतरुणांच्या संदर्भातील आरक्षणाला भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना इत्यादी हे सर्वच पक्ष मिळून संपवल्याशिवाय राहणार नाहीत! आणि याचा दुष्परिणाम तुमच्या किती पिढ्यांवर होईल! याचा अंदाज सुद्धा ओबीसी व मुस्लिम बांधवांना येऊ शकणार नाही! त्यामुळे शक्य तितक्या लवकर बाळासाहेब आंबेडकरांनी अकोट मध्ये केलेल्या भाषणाची क्लिप ऐकून सावरले पाहिजे! व स्वतःला योग्य निर्णय घेण्यासाठी तयार केले पाहिजे! आता जर आपण उशीर केला तर ही तुम्हा सर्वांची घोडचूक ठरेल! हे लक्षात घ्या! आज रोजी सर्व आरक्षणवाद्यांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून वंचित बहुजन आघाडीने उभे केलेल्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणले तर महाराष्ट्रात एससी, एसटी, ओबीसी, व मुस्लिम अशा सर्व कॅटेगिरीतील सर्व समूहांना सुखा समाधानाने वैभवात नांदता येईल!

अन्यथा-----! जय भीम.... जय भारत

**– जीवन बोदडे भांबेरी**
मो.नं.९६८९२६८६२०

# आरक्षण वाचवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निवडून द्या – श्रीरंग ससाणे

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

सामाजिक न्याय आणि आरक्षण वाचवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन सामाजिक समता संघाचे संस्थापक अध्यक्ष श्रीरंग ससाणे यांनी केले आहे. औरंगाबाद येथे अँड बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांनी एकत्रितपणे ९ उमेदवार उभे केले असून, महाराष्ट्रभर २०० उमेदवार उभे केले आहेत.



आरक्षण टिकवण्यासाठी कटीबद्ध

वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन करताना ससाणे म्हणाले की, 'एससी, एसटी, मुस्लिम आणि ओबीसी घटकांतील शेवटच्या माणसापर्यंत आरक्षणाचा लाभ पोहोचला पाहिजे. मात्र, अद्याप या घटकांना आरक्षणाचा संपूर्ण लाभ मिळालेला नाही. त्यामुळे आरक्षण वाचवण्यासाठी या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार मोठ्या प्रमाणात निवडून द्या.'

सामाजिक समता संघाचे योगदान सामाजिक समता संघटनेच्या माध्यमातून आरक्षण टिकवण्यासाठी झटणाऱ्या विविध पदाधिकाऱ्यांनी आपले योगदान दिले आहे.

संस्थापक अध्यक्ष: श्रीरंग ससाणे, मराठवाडा अध्यक्ष: निवृती गायकवाड, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य: अजीज खान, दैवत खान तंबाखूवाले, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य: जगदेव मस्के, सरचिटणीस: अँड. महिंद्रकुमार रंगारी, सल्लागार मंडळ: मोहन गायकवाड, सुनील जाधव, संदीप दाडगे, रणरागिनी: रेखा उजगरे, संगीत प्रधान आरक्षणासाठी एकत्र येण्याचे आवाहन.

या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहोचवण्यासाठी आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार एकमेव पर्याय असल्याचे मत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

आरक्षण टिकवण्यासाठी मतदान करा– प्रत्येक नागरिकाने या निवडणुकीत मताचा अधिकार बजावत आरक्षण वाचवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मतदान करावे, असे आवाहन श्रीरंग ससाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

# गेवराईत ओबीसीची एकजूट; वंचित उमेदवार विजयी होणार?

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**गेवराई/प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघात सध्या मोठी राजकीय हालचाल पाहायला मिळत आहे. विशेषतः ओबीसी समाजाच्या एकजुटीने येथील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल घडवून आणला आहे. यामुळे वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराच्या विजयाची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

**ओबीसी एकजुटीचे महत्व**

या मतदारसंघात ओबीसी मतदारांची संख्या लक्षणीय असून, गेल्या काही वर्षांपासून त्यांची राजकीय भूमिका निर्णायक ठरत आहे. यंदा या समाजाने वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे इतर पक्षांमध्ये असलेली मतांची फाटाफूट आणि गोंधळ वंचित उमेदवारासाठी फायद्याची ठरत आहे.

**मराठा उमेदवारांची फाटाफूट**

गेवराईत यंदा सहा मराठा उमेदवार रिंगणात आहेत. या उमेदवारांमध्ये परस्पर टक्कर असल्याने मराठा समाजातील मतांचे विभाजन होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत एकसंघ राहिलेला ओबीसी मतदारवर्ग वंचित उमेदवाराला निर्णायक विजयाकडे नेऊ शकतो.

**प्रथमच क्रांतिकारी सत्तापरिवर्तनाची शक्यता**

गेवराई विधानसभा मतदारसंघात आजवर काही ठरावीक पक्ष आणि नेत्यांचे वर्चस्व राहिले आहे. परंतु, यंदा ओबीसी समाजाची ताकद आणि वंचित आघाडीची भूमिका पहाता, या तालुक्यात पहिल्यांदाच क्रांतिकारी सत्तापरिवर्तन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वंचित उमेदवाराने निवडणूक प्रचारादरम्यान ओबीसी समाजाच्या समस्या आणि मागण्या यावर भर दिला. तसेच, समाजातील सर्व स्तरांतील लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळेच त्यांना मोठ्या प्रमाणात जनाधार मिळत असल्याचे दिसत आहे.

**स्थापित नेत्यांमध्ये अस्वस्थता**

ओबीसी समाजाच्या एकजुटीमुळे सत्ताधारी आणि पारंपरिक पक्षांच्या नेत्यांमध्ये अस्वस्थता दिसत आहे. पूर्वीचे मतांचे समीकरण बदलल्यामुळे त्यांची चिंता वाढली आहे. मतदारसंघातील बदलते राजकीय वारे लक्षात घेता, या नेत्यांनी जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याचा प्रयत्न केला असला, तरीही त्याचा फारसा परिणाम होण्याची शक्यता कमी वाटत आहे.

**गेवराईतील एकच चर्चा**

गेवराईत वंचित उमेदवाराच्या विजयाबद्दल सध्या गावोगावी चर्चा होत आहे. अनेकांनी याला 'क्रांतिकारी राजकीय बदलाचा क्षण' असे संबोधले आहे. सध्या घोडामैदान अगदी समोर असून, अंतिम निकाल काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**निकाल निर्णायक ठरणार**

सर्व परिस्थिती पाहता, यंदाची निवडणूक ही गेवराईसाठी ऐतिहासिक ठरण्याची दाट शक्यता आहे. ओबीसी समाजाने दाखवलेली एकजूट आणि मराठा समाजातील फाटाफूट यामुळे वंचित उमेदवाराच्या विजयाचा मार्ग सुकर झाला आहे. आगामी काही दिवसांत नेमकी स्थिती कशी असेल, हे स्पष्ट होईल. मात्र, या सत्तापरिवर्तनामुळे तालुक्यातील राजकारणाला एक नवीन दिशा मिळण्याची शक्यता आहे.






संपादकीय

# मतदान कसे करणार?

लोकशाहीला सशक्त करण्यासाठी मतदान केले पाहिजे. मतदान करणे पवित्र कर्तव्य आहे. न विसरता मतदान करा, असे आवाहन क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर यांनी एका जाहिरातीवदारे केले आहे. खरे म्हणजे सचिन तें डुलकरांच्या आवाहनास का म्हणून महत्त्व द्यावे. या आवाहनास प्रतिसाद का द्यावा कारण आमच्यासमोर म्हणजे मतदारांसमोर सचिन तेंडुलकर यांच्यापेक्षाही महान आदर्श आहे. तो महान आदर्श म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. आम्ही तेंडुलकरांपेक्षा बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्श व क्रांतीकारी विचार सरणीला महत्त्व देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श निवडणूक अधिकारी अथवा निवडणूक आयोगाने भारतीय म तदारांसमोर का मांडला नाही. मतदानाचे महत्त्व किती? या विषयीचे अनेक संदेश बाबासाहेब आंबेडकरांनी जनतेला आपल्या विचारसरणीतून दिलेले आहेत. बाब ासाहेबांचाच संदेश निवडणूक आयोगाने जाहिरातीच्या माध्यमातून जनतेपर्यंत का पोहचवला नाही. सचिन तेंडुलकरला महत्त्व देण्यात निवडणूक आयोगाने का धन्यता मानली? सचिन तेंडुलकरचा पर्याय आयोगाला का सुचला? सर्वात प्रभावी व क्रांतीकारी कोण? तें डुलकर की आंबेडकर? याची शहानिशा निवडणुक यंत्रणेने का केली नाही. मतदान पवित्र आहेत, पण हा संदेश तें डुकरांपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीच्या आधारानेच देणे अधिक रास्त ठरले आहे. मतदान पवित्र आहे. हे संविधान सांगते. मतदान पवित्र आहे. हे शहाणपण मतदारांना विनाकारण कोणी तरी शिकवू नये? मतदारांनी पावित्र्य जपायचे व निवडून जाणाऱ्यांनी याच मतदारांची घोर उपेक्षा करायची! ही विसंगती जर लक्षात घेतली तर सुजाण मतदारांमध्ये अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे. मतदार निवडून देतात व निवडणुक जाणारी मंडळी मात्र पक्षांतरे करत राहतात. ही विसंगती देखील खऱ्या अर्थाने अस्वस्थ करणारी आहे. थोडक्यात सांगायचे हेच की, मतदारांना नेत्यांनी अथवा सचिन तेंडुलकरांनी शहाणपण शिकवायची गरज नाही. कारण जनतेसमोर अत्यंत महान आदर्श आहेत.

# बाबासाहेबांच्या घराण्याला साथ द्या हो, बाळासाहेबांची ही शेवटची निवडणुक आहे

राखीव जाग्यावरील मतासाठी ज्या एस.सी एस.टी समाज्याकडे हे प्रस्थापित राजकारणी नेते पाहत होते. आणि जाता जात नाही ती जात अशी जातीची स्थिती होती.. अशा वेळेस बाळासाहेबांनी अकोला जिल्हातुन ओपन (सर्वसामान्य मतदार संघातुन निवडणुक लढवत आहे.. प्रस्थापित राजकारणी लोक आपल्याला राखीव जागेवर ही सपोर्ट करत नाही तर सर्वसामान्य जागेवर सपोर्ट कसा करणार.. अशा परिस्थितीत बाळासाहेबांनी या अकोला जिल्हात मात्र सोशल इंजिनिअरींग चा प्रयोग यशस्वी केला आणि जि.प आणि मनपा म ध्ये काही वर्षे वेगवेगळ्या जाती समुहाला प्राधान्य देऊन सत्ता मिळवली ...

आणि सत्ता मिळाल्यानंतर ती सत्ता सर्वसामान्य लोकांकरीता शिक्षण,आरोग्य,आणि शेतकरयाकरीता प्राधान्य दिले,,,

यासाठी ४४ वर्षे राजकारणात आहे..

सध्या मुस्लिम समाज्याचे औसवी असु द्या ..मराठा समाजाचे जरांगे पाटील असु द्या. कि ओ.बी.सी समाज्याचे प्रकाश शेंडगे असु द्या या मातब्बर नेत्यांनी बाळासाहेबांना सपोर्ट करावा म्हणुन आवाहन केले आहे......

पण आपल्याच समाज्यातील काही हाताच्या बोटावर मोजता येईल इतके शिकलेले, अतिहुशार,मात्र बाळासाहेबांना विरोध करत आहे...

स्वाभिमानी मनाने विचार करा

१) महाराष्ट्रात २००० नंतर आंबेडकरी राजकीय पक्षाचा कोणता नेता स्वबळावर खासदार झाला का?

२) महाराष्ट्रात अशा कोणता आंबेडकरी विचारांचा राजकीय पक्ष आहे का ज्यांनी किमान ४० लाखापेक्षा जास्त मतृ घेतली.

३) ते घटना बदलतील ,ते आपल्यावर अन्याय अत्याचार करतील अशी भिती दाखवुन प्रस्थापित राजकीय पक्षाने आतापर्यंत आपली मते घेतली. आपली राजकीय वेगळी ओळख निम र्णिच करु दिली नाही..

४) राजकारणात ते तुम्हाला एखादी राज्यसभा देतील एखादी विधानपरिषद देतील .पण तुमचा राजकीय पक्ष वाढवुन देणार नाही.

५) जरा विचार करा आपण आपल्या ग्रामपंचायतीमध्ये सर्वसामान्य जागेवर किमान सदस्याकरीता किंवा सरपंच पदाकरीता उभे उभे रहा..



बघा त्यावेळी गावातील लोकांची म नसिकता..

आणि हिच म नसिकता पुर्ण बहुजनवादी आंबेडकर वादी बाळासाहेबांनी अकोल्यामध्ये केले. ईतर जाती धर्मातील नेते सम ाजकारणी बाळासाहेबांना सपोर्ट करतात..

पण ज्याला गल्लीत कोणी ओळखत नाही तो मात्र बाळासाहेबांना विरोध करतो..

६) जरा विचार करा बाबासाहेबांनतर आणि दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर पुन्हा एकदा आंबेडकरी विचारांचा स्वाभिमानी नेतृत्व आणि आंबेडकरी विचारांची एक राजकीय पक्ष उभा राहतोय... यावेळी सपोर्ट करा..

७) अजुन किती वर्षे विजय मिळणार नाही या भितीने घाबरुन विचार दुसरयांच्या उकिरड्यावर राहणार आणि तेथेच जेवणार त्याच्या वळचणीला बसणार...

जरासा स्वाभिमान शिल्लक असेल तर कधीतरी विचार करा..

आंबेडकरी विचारांचे आज ही एक मोठा मिडीया तर आपण उभा करु शकलो नाही.. पण हा मिळणारा सोशल मिडीयाचा उपयोग करुन बाळासाहेबांना आणि वंचित आघाडीच्या उम ेदवारांना सपोर्ट तर करु शकतो.

८) विचार करा खैरलांजी घडवली गेली त्याही वेळेस केलेल्या आंदोलनात प्रस्थापित राजकीय पक्षाच्या नेत्यांनी आपल्या बाजुने कधीच आंदोलने केली नाही.. ज्या आपण आंदोलन केले म्हणुन आपल्याला नक्षलवादी बोलले त्यामुळे एका आम दारांनी राजीनामा दिला तेच चळवळीतुन पुढे आलेले आमदार सध्या भाजपला सपोर्ट करतात,. किती शिकांतिका

९) चळवळीतील एका नेत्याला खासदारकीच्या वेळी प्रस्थापितांनी पाडले म्हणुन याचा बदला घेण्यासाठी ते डायरेक्ट भाजपमध्ये गेले.

१०) काँग्रेसने मुख्यमंत्री केले पण मुळातच तो नेता हिदुत्ववादी विचारांचा होता त्याच नेत्याने २०१९ मध्ये बाळासाहेबांच्या विरोधात अकोल्याम धुन एक उमेदवार दिला म्हणुन बाळासाहेब पडले,

११) आज ही बाळासाहेबांच्या विरोधात जे आधी भाजपमध्ये होते त्याच पटोलेनी पृथ्वीराज चव्हाण यांनी बाळासाहेब हे आघाडीत नको म्हणुन खरगेंना अहवाल दिला होता.जरांगे पाटील यांचा बाळासाहेबांना सपोर्ट करतील म्हणुन जाणुनबुजुन (मराठा )पण कट्टर आर.एस.एस चा एक व्यक्ती आणि कट्टर हिदुत्ववादी नेता बाळासाहेबांच्या विरोधात आता उभा केला आहे.तरीही स्वाभिम ान गहाण टाकलेले,प्रस्थापिताच्या उकीरड्यावर राहणारे काही तथाकथित स्वयंघोषित आंबेडकरी व्यक्ती बाळासाहेबांवर टिका करतात,,

शेवटचे एकच छत्रपती शाहु महाराजांचे कार्य म्हणुन आताचे जे शाहु घराण्यातील शाहु म हाराजांना निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी एकत्र येऊन तिकिट तर दिलेच पण त्यांच्यावर प्रस्थापितांपासुन विरोधक कोणीही टिका करत नाही..

पण बाबासाहेब आंबेडकर यांच्या घराण्यातील बाबासाहेबांचे नातु प्रकाश आंबेडकर यांच्यावर मात्र आपल्यातीलच काही समाजकंटक/ आणि प्रस्थापितांचे दलाल मात्र टिका करताना दिसतात..

बाबासाहेबांविषयी अभिमान असेल तर बाळासाहेबांना सपोर्ट करा ...कारण बाबासाहेबांनंतर पुन्हा एकदा स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ बाळासाहेब उभे करत आहे.यासाठी पुन्हा एकदा वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना सपोर्ट करा..आपला विजय नक्की आहे

बाळासाहेबांची ही शेवटीच निवडणुक आहे..

आजही बाबासाहेबांचे घराणे एकत्रच आहे. बाबासाहेबांचे नातु बाबासाहेबांचा विचार पुढे घेऊन जात आहे. एकाच विचाराचे तीन ही भाऊ आहेत एकमेकांसगे त्यांचे छान जमते.. अशा वेळी बाबासाहेबांनी जर आपल्यासाठी खुप केले तर आपण बाबासाहेबांच्या घराण्यासाठी आपण कार्यकर्त्यांनी हि सहकार्य केलेच पाहिजे...नाहीतर काही घराणे बघा.

**– यश भालेराव**
९०६७०४७३३३

# आचारसंहिता भंगाच्या तक्रारी, ६७३ कोटी २२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

मुंबई : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक– २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण ९ हजार २९३ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ९ हजार २६५ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.



सी–व्हिजिल ॲपद्वारे नागरिक आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत तक्रार दाखल करू शकतात. हे ॲप कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाउनलोड करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

**६७३ कोटी २२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त**

राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ६७३ कोटी २२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. राज्यभर आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

# ऑनलाईन सुनावणीस सरन्यायाधीशांचा नकार

नवी दिल्ली : राजधानी दिल्ली आणि परिसरामध्ये हवा प्रदूषणाने गंभीरतेची पातळी ओलांडली आहे. प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयातील वकिलांनी दिल्लीतील न्यायालयांच्या सुनावण्या ऑनलाईन घेण्याची विनंती सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्याकडे केली. त्यांनी ऑनलाईन सर्व सुनावण्या घेण्यास नकार दिला.

प्रदूषणाची पातळी पाहता त्यांनी वकिलांना दूरदृश्यप्रणालीद्वारे हजर राहण्याची परवानगी दिली आहे. सरन्यायधीश संजीव खन्ना यांनी वकिलांना सांगितले की, ज्या प्रकरणांमध्ये दूरदृश्यप्रणालीद्वारे सुनावणीची शक्यता आहे, त्यामध्ये घेतली जाईल. दिल्लीतील गंभीर प्रदूषणामुळे भारताचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, ज्येष्ठ वकील व सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष कपिल सिब्बल, ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी सरन्यायाधीशांकडे सर्व प्रकरणांच्या सुनावण्या ऑनलाईन घेण्याची विनंती केली होती. शंकरनारायणन यांनी सरन्यायाधीशांना सांगितले की, दररोज १० हजार वकील त्यांच्या वाहनांतून प्रवास करतात. ऑनलाईन सुनावण्यांमुळे यामध्ये बराच फरक पडू शकतो.

# आता इंटरनेट सेवांचा दुर्गम भागातही वाढणार वेग

**फ्लोरिडा :** भारताचे अत्याधुनिक कम्युनिकेशन सॅटॅलाइट GSAT-N2 अवकाशात झेपावले आहे. भारतीय अंतराळ संशोधन (ISRO) संस्थेचे हे सॅटेलाईट उद्योगपती इलॉन मस्क यांनी डरलिशद यांच्या ऋश्रलेप ९ रॉकेटच्या सहाय्याने प्रक्षेपित करण्यात आले आहे. अमेरिकेतील फ्लोरिडा येथील केप कार्निव्हल येथून या उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले. याचे कार्य सुरू झाल्यानंतर भारताची दळणवळण व्यवस्था अधिक बलशाली होईल, असे सांगितले जात आहे.

भारताचे स्वतःचे रॉकेट मार्क–३ हे केवळ ४,००० किलो वजनाचे सॅटेलाइट अथवा उपग्रह अवकाशात घेऊन जाऊ शकते. मात्र, GSAT-N2 चे वजन ४,७०० किलो एवढे आहे, जे खूप अधिक आहे. यामुळे इस्रोने स्पेसएक्स या अमेरिकन कंपनीची मदत घेण्याचा निर्णय घेतला. डरलिशद चे रॉकेट म ोठे आणि शक्तिशाली आहेत. यामुळे ते GSAT-N2 अवकाशात पाठवू शकले. इस्रोसाठी दुसऱ्या कंपनीचे रॉकेट वापरण्याची ही पहिलीच वेळ असेल.

या सॅटेलाइटच्या सहाय्याने दुर्गम भागांतही इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होईल. या सॅटेलाइटचे मिशन लाइफ १४ वर्षांचे आहे.

यासंदर्भात ISRO चे प्रमुख एस सोमनाथ यांनी ही माहिती दिली. लॉन्चिंग दरम्यान ते म्हणाले, “GSAT 20 चे मिशन लाइफ १४ वर्षं एवढे आहे आणि जमिनीवरील पायाभूत सुविधा सॅटेलाइटच्या म दतीसाठी तयार आहे.

आतापर्यंत भारतात फ्लाइटमध्ये इंटरनेट वापरण्याची परवानगी नव्हती. मात्र, आता सरकारच्या बदलत्या नियमांनुसार इंटरनेट वापरण्यास परवानगी आहे . आता विमान ३००० मीटर एवढ्या उंचीवर पोहोचल्यानंतर प्रवाशांना आपल्या मोबाईलवर इंटरनेट चालवता येईल. याच बरोबर, प्रवाशांना वाय–फायच्या माध्यमाने इंटरनेट सेवा वापरण्याची परवानगी तेव्हाच दिली जाईल, जेव्हा त्या उंचीवर पोहोचल्यानंतरही विमानात इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वापराची परवानगी दिली जाते, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

# मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक २०२४ साठी बुधवार दि. २० रोजी मतदान होणार आहे. मतदान निर्भय व निष्पक्ष होण्यासाठी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करुन खालील बाबींना मनाई करण्यात आली आहे.

मतदान केंद्राच्या १०० मिटर परिसरात मतदानासाठी नियुक्त कर्मचारी व मतदानासाठी रांगेत उभे असलेले मतदार वगळता पाच किंवा पाचापेक्षा अधिक लोकांनी एकत्र येणे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन, कॉर्डलेस फ्फोन, लाऊड स्पिकर, मेगा फ्फोन, मायक्रोफ्फोन, वायरलेस सेट वापरणे. मतदानाच्या गोपनियतेचा भंग होईल अशी कृती करणे. मतदान केंद्रातील प्रतिनिधी वा इतर प्रतिनिधी यांनी मोबाईल वापरणे. मतदान केंद्र परिसरात शस्त्र बाळगणे, परवानगी दिलेल्या व्यतिरिक्त वाहनांचा वापर करणे, वाहनांद्वारे मतदारांची ने आण करणे (परवानगी दिली असल्यास ती वाहनाच्या दर्शनी भागात लावावी), निवडणूक प्रचार करणे, ज्वलनशील स्फ्फोटक पदार्थ , हत्यारे बाळगणे इ. कृत्य करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या आदेशाचा भंग झाल्यास भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ प्रमाणे कारवाई करण्यात येईल,असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

**मतमोजणी केंद्र परिसरात मनाई आदेश**

विधानसभा निवडणूक २०२४ साठी शनिवार दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे. मतमोजणी शांततेत व्हावी यासाठी मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे. त्याअन्वये मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्राधिकृत व्यक्तिंव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तिस प्रवेश करण्यास, मोबाईल नेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश मतमोजणी अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी यांना लागू राहणार नाहीत,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# स्व.इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दीन साजरा




**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज माजी पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंतनिमित्त अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालय येथे मां.अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच आज राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त शपथ घेण्यात आली.

यावेळी सहायक आयुक्त संजय सुरडकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ्फ अहमद,जनसंपर्क विभागाचे रविंद्र खरात, नविद शेख, इंझमाम हक, आदींची उपस्थिती होती.

# तिची ‘अक्कल’ !

**घरात** एकच बेअक्कल यंत्र असते . रोबोट . मंगळसूत्र घातलेले असे यंत्र , कायम फ्रेश हवे , कायम कामात हवे , कायम जबाबदारी सांभाळणारे हवे , कुकिंग पासून ते सेक्स पर्यंत सगळं 'हो ' या एकाच कमांड वर काम करणारे एक यंत्र . जिला स्वतःची 'अक्कल ' कधीच नसते . सगळ्यांच्या अकलेप्रमाणे कलेप्रमाणे चालावे वागावे रहावे लागते . . . तिला बोरिंग बायको म्हणा , इरिटेटिंग आई म्हणा , अनोयिंग बहीण म्हणा किंवा गुड फ्फॉर नथिंग गर्लफ्फ्रेंड . . तिला अक्कल नसते या समान धागा तिच्या वेदनेला बांधणारा असतो.



तिला खरंच अक्कल नसते का ? हे ठरवायला आपले कोठे अकलेच्या कांद्याचे शेत आहे ? पण तिला अक्कल नसतेच . . जे काही अपूर्ण असते ते तिचे असते . अगदी संसार पण ! तिला पूर्ण करायचा प्रयत्न कधीच होत नाही . मला पूर्ण करा म्हणून ती अपेक्षा व्यक्त करते तेव्हा 'मला अक्कल शिकवू नकोस ' या चार शब्दात तिची घुसमट दाबली जाते . तिचे विचार स्वतंत्र असतील तर ती कोडगी असते . चच –मॅरेज मटेरियल असेल तर नेक्स्ट टू डिसस्टिंग असते . तिने जगायचं कसं ? तिची अक्कल वापरली तर जग नवऱ्याला ऐतखाऊ , ताट खालचे मांजर , बायकोचा बैल म्हणून हिणवते . नवर्याच्या अकलेने जायचं तर काय माठ सून /आई / बायको आहे म्हणून ऐकून घ्यावे लागते . तिची अक्कल . . . सर्वाना टपली मारायलाच असते !

तिच्या संवेदना कालांतराने बोथट होतात . संवेदना बोथट व्हायला वयाची अट नसते . तिला नाते नको असते , स्पर्श नको असतो , मानेखालचे कायम रिस्पॉन्स द्यायला बांधिलच असलेल्या शरीराचा तिला उबग येतो . . कधीच आपल्या मनाच्या कोपऱ्यात कोणीच का बघत नाही याची खंत तिला असते . आपल्या मताला काहीच किंमत नाही याची बोच तिला असते . माझे कोणीच ऐकत नाही याचे ओरखडे मनावर उमटलेले असतात . चार चौघात 'अक्कल नाही का तुला ?' असा झालेला अपमान सततचा आणि ताजा असतो . माझे घरातील / यांच्या –त्यांच्या आयुष्यातील नक्की जागा काय ? या प्रश्नाचा विचार करत . . . . अखेर कोणत्यातरी डॉक्टरांच्या समोर जाऊन बसते ! निदान झाल्यावर , औषध सांगितल्यावर . . हे जमेल ना ताई ? असा प्रश्न डॉक्टरांनी विचारल्यावर . . . आतापर्यंत मोबाईल मधे बिझी असलेला नवरा तत्परतेने म्हणतो – तिला काय अक्कल आहे ? मलाच बघायला हवे सगळे . . . तिचे आजारपण फ्फक्त तिचे असते . . पुन्हा अपमानित होऊन ती बाहेर पडते . तिची अक्कल मागे ठेऊन . . . डॉक्टर तुम्हाला तरी ही वर्थ वाटते का बघा . . असा एक प्रश्न मागे ठेऊन . . तिची अक्कल . . . . काढायला सोपी . . सांभाळायला मात्र नारायण मूर्तीसारख्या सन्माननीय अपवादांचे गुण असायला हवेत !

'रस क्षय ' या आयुर्वेदीय निदानाचे अनेक आयाम आहेत . एक पैलू समोर ठेवला . आदर देता येत नसेल तर किमान अक्कल काढू नका . . ती सुद्धा दुखावली जाते . . फक्त ते दाखवायची तिला परवानगी नसते !

**– वैद्य .अंकुर रविकांत देशपांडे**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक रतन नामदेव साळवे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं. ए-३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को.-ऑप. सोसायटी लि.,एमआयडीसी रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)-४३१००१ येथे छापून एफ-४/१४, अयोध्यानगर, एन-७, सिडको, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)-४३१००१ येथे प्रसिद्ध केले.
• संपादक - **रतन नामदेव साळवे** • मो. 9923502320 • Email : **nilepratik02@gmail.com.**

# प्रकाश आंबेडकर यांच्या बदनामीसाठी लेखण्या सरसावल्या आहेत

## आंबेडकरवाद्यानी सावध राहावे...

गेल्या लोकसभा निवडणुकीपासून प्रकाश आंबेडकर महाविकास आघाडीसोबत येत नाहीत म्हणून काही काँग्रेसभक्त लेखक,विचारवंत,पँथर्स कडून त्यांची जास्तीत जास्त बदनामी आणि त्यांना जबरदस्तीने ठडड/भाजपची मदत करणारे नेते म्हणून सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत.

१. प्रकाश आंबेडकर यांनी भाजप बरोबर काँग्रेसच्या उपवर्गीकरण व क्रिमिलियर बाबतच्या दु-तोंडी भूमिकेचा नेमका मुद्दा उचलून धरल्याने महाविकास आघाडीच्या पायाखालची वाळू घसरू लागल्याने त्यांचे गुलाम(लेखक,विचारवंत आणि पँथर्स) आता कामाला लागलेले दिसून येत आहेत. त्यातून प्रकाश आंबेडकर यांची जास्तीत जास्त बदनामी करून आंबेडकरी मतदार महाविकास आघाडीकडे खेचण्याचे काम केले जाईल, हे मात्र नक्की.

२. OBC आरक्षण संबंधी डेटा राज्य सरकारने सुप्रीम कोर्टाला सादर न केल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेतल्या जात नाहीत,हे कुणीही सांगेल.प्रकाश आंबेडकर या संबंधी जे काही बोलत आहेत,ते सत्यच आहे : मात्र काँग्रेसी गुलाम प्रकाश आंबेडकर हे दिशाभूल करीत आहेत,अशी मांडणी करून सर्वांचीच दिशाभूल करीत आहेत.

३. उपवर्गीकरण आणि क्रिमिलियर बाबत प्रकाश आंबेडकर यांची भूमिका पूर्वीपासून स्पष्टच आहे. विनाकारण प्रकाश आंबेडकर यांनी यापूर्वीच याचं समर्थन केलं आहे,असं सांगून प्रकाश आंबेडकर यांच्या गळी हे मुद्दे उतरविण्यासाठी काही लोक आपल्या लेखण्या झिजवत आहेत.

४. प्रकाश आंबेडकर यांनी अगदी सुरवातीपासूनच मराठा आणि जइउ यांचं ताट वेगळं असलं पाहिजे,अशी स्पष्ट भूमिका घेतलेलीच आहे,तरीही त्यांना या प्रश्नावर घेरण्याचा प्रयत्न केला जात आहे.मराठा आरक्षण आणि जइउ आरक्षणावर चकार शब्द न काढणारे प्रस्थापित पक्ष विशेषतः महाविकास आघाडीचे घटक पक्ष निर्दोष आणि ओबीसी आरक्षण बचाव यात्रा काढणारे प्रकाश आंबेडकर ओबीसी आरक्षणाचे विरोधक कसे ?

५. लोकसभा निवडणुकीत संविधान आणि लोकशाहीच्या मुद्द्यावर फ़्रसविणारे महाविकास आघाडीचे घटक पक्ष सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर आणि मराठा,ओबीसी आरक्षणावर कोणतीच भूमिका घेऊ शकलेले नाहीत, हे महाराष्ट्रातील जनतेला माहीत आहे.आंबेडकरी जनता इतर सम ूहांच्या तुलनेत अधिक हुशार आहे,त्यांना एकदा आपली फ़्रसवणुक झाल्याचे माहीत झाल्याने ते या निवडणुकीत हात दाखवतील,याची भीती महाविकास आघाडीला असल्याने त्यांचे गुलाम कामाला लागलेले दिसत आहेत.

आपल्या लेखणीतून मोठ- मोठ्या बाता हाणीत आहेत,आपली अक्कल पाजळत आहेत ; मात्र त्यांना हे ठाऊक नाही की प्रकाश आंबेडकर हे एकमेव स्वाभिमानी आणि स्वतंत्र नेतृत्व आहे.बहुतांशी आंबेडकरी जनता त्यांच्याच पाठीशी आहे.ती जनता तुमच्या सारख्या पाकिटमार गुलामांच्या लेखण्यांना कदापिही बळी पडणार नाही.

**– मनोज काळे**

# भारतीय मतदार नागरिकांनों उद्याचा भारत उद्योगपती भांडवलदारांचा गुलाम असेल,तुम्ही काय करणार !

मतदार बांधवांनो,तुम्ही कुण्या ही जाती-धर्माचे वंशाचे असा भारतीय जनता पार्टी जर सरकारमध्ये राहिली तर हा भारत देश केवळ २० वर्षासाठी आहे आणि जर काँग्रेस सत्तेमध्ये राहिली तर जास्तीत जास्त हा भारत ४० वर्षाचा असेल ! पुढचा भारत हा कंपन्यांचा खाजगी कंपन्यांचा गुलाम असेल ! आता तुम्ही ठरवा उद्योगपती भांडवलदारांची हजारो कोटीची कर्ज माफ करणाऱ्या भाजपा/काँग्रेसला सत्तेत आणायचं की ‘संविधानप्रेमी‘ ‘आरक्षणवादी‘ वंचित बहुजन आघाडीला.....

आज आपण सरकारने दिलेल्या पंधराशे (१५००/-) रुपयांवर खुश आहोत.परंतु आपणाला पंधरा हजार रुपये देऊन दुसऱ्या बाजूला जीएसटी च्या माध्यमातून देशातील प्रत्येक जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढविले याकडे मात्र आपण पाहत नाहीत. एक बाजूला महाराष्ट्र सरकार असो किंवा केंद्र सरकार असो आपणास छोट्या छोट्या आर्थिक लाभाच्या योजना देते आणि दुसऱ्या बाजूला अरबो खरबो रुपयांची कर्ज उद्योगपती भांडवलदारांची माफ़्र करतं तर या आर्थिक तुटीचा भार आपल्या सर्वांवरच पडणार आहे हे का आपण लक्षात घेत नाहीत.

भारतातील बडा उद्योगपती भांडवलदार पुंजीपती वर्ग आणि सत्तेत असणाऱ्या काँग्रेस समाजवादी भारतीय जनता पार्टी यांचे मुख्य ध्येय म्हणजे भारतामध्ये बहुजन समाजावर गुलाम गिरी लादणे होय.आणि यासाठीच कार्पोरेट उद्योग जग व भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेसच्या आघाड्या भारतीय नागरिकांच्या ‘करातून‘ जमा केलेल्या पैशाच्या बळावर उद्योगपती आणि भांडवलदाराच्या हिताचे निर्णय घेऊन लोकशाहीच्या माध्यमातून हुकूमशाही उद्योगपती उद्योगपती भांडवलदारांचा राज्य निर्माण करण्यात येत आहे. जे बहुजन समाजाच्या कधीच हिताचे ठरणारे नाही.

भारत स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांमध्ये भारतातील बडे उद्योगपती भांडवलदार यांना पोहोचण्यासाठी तत्कालीन काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीने अरबो आणि खरबू रुपयाची कर्ज उद्योगपती भांडवलदारांची आतापर्यंत माफ़्र केलेली आहेत.सरकारच्या तिजोरीतून निर्माण होणारी ही तूट आर्थिक तूट कोणाच्या खिशातून भरून काढण्यात येते याचा विचार सुज्ञ मतदारांनी करणे गरजेचे आहे.

आजच्या स्थितीला देशातील खाजगी कंपन्या कार्पोरेट कार्पोरेट उद्योग जग बहुजन समाजातील तरुणांची कशाप्रकारे हेळसान करते हे आपण कदाचित लक्षात घेतले नसावे. आपल्या घरातील एखादा कर्ता पुरुष जर एखाद्या खाजगी कंपनीत काम करत असेल तर त्याला थोडंसं विचारा की तो कशाप्रकारे नोकरी एखाद्या खाजगी कंपनीमध्ये करत आहे. आयटी तंत्रज्ञानाच्या बळावर एखाद्या शिक्षिकाला गुलाम बनून ठेवण्याचं काम ह्या सर्व खाजगी कंपन्या करतात. हे कोणीही नाकारू शकत नाही.

एक बाजूला धर्म आणि धर्माचा बुरखा तर दुसऱ्या बाजूला जातीय दंगली आणि धर्माच्या नावावर मताच्या ध्रुवीकरणाचा राजकारण करायचं आणि भारतीयांच्या हिताचे कोणतेच निर्णय घ्यावयाचे नाहीत असे धोरणं आतापर्यंतच्या काँग्रेस सरकारने आणि मागच्या दहा वर्षात भारतीय जनता पार्टीने घेतलेले आहेत.

वास्तविक पाहता मताधिकार मताधिक्याने बलाढ्य असलेला बहुजन समाज खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे भूमिका घेणाऱ्या भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेसला आपले मतदान करत असतो. यातून ना कोणता धर्म जोपासला जातो ना कोणती नीती जोपासली जाते जोपासले जाते ते फ़्रक्त उद्योगपती भांडवलदारांचे हितसंवर्धन, उद्योग बड्या उद्योगपती आणि भांडवलदाराचे हित संवर्धन जोपासले जात असताना भारतीय बहुजन समाजातील गोरगरीब अडाणी अंध अपंग यांचे बौद्धिक दृष्ट्या मानसिक दृष्ट्या शारीरिक दृष्ट्या हाणनच करण्याचा प्रयत्न सातत्याने करण्यात येतो. मग अशा भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेसच्या आघाड्यांना आपण मतदान का करावयाचे याचा विचार उद्या मतदान करताना प्रत्येक मतदाराने केला पाहिजे. तरच आपण संविधानाने मिळणाऱ्या नोकऱ्या, इतर सुविधा आणि आपापसातील भाईचारा कायम करू शकतो.

**– विजय अशोक बनसोडे**
भारतीय बौद्ध महासभा
धाराशिव (द) जि.संस्कार
उपाध्यक्ष,८६००२१००९०

# विनोद तावडेंनी मला २५ वेळा फोन केल; हितेंद्र ठाकूर यांचा मोठा दावा; पैसे वाटपाच्या आरोपांमुळे खळबळ!

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**मुंबई /प्रतिनिधी**

विनोद तावडेंवर पैसे वाटप केल्याचा आरोप हितेंद्र ठाकूर यांनी केला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता संपुष्टात आला आहे. आता बुधवारी म्हणजेच २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. पण एकीकडे मतदानाकडे सगळ्यांचं लक्ष असताना दुसरीकडे विरारम ध्ये खळबळजनक घडामोडी घडताना दिसत आहेत. विरारच्या विवांत हॉटेलमध्ये भाजपाचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे पैसे वाटत असल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर यांनी केला आहे. दुसरीकडे भाजपानं हे आरोप फ़्रेटाळून लावले आहेत. विनोत तावडेंनी यादरम्यान २५ वेळा आपल्याला फ़्रोन करून माफ़्री मागितल्याचा दावा हितेंद्र ठाकूर यांनी केला आहे.





**नेमकं काय घडलं विरारमध्ये ?**

विरार पूर्वच्या मनोरीपाडा परिसरातील विवांता हॉटेलमध्ये आज सकाळी अचानक खळबळ उडाल्याचं पाहायला मिळालं. भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे या हॉटेलमध्ये आले होते. भाजपाच्या या मतदारसंघातील उमेदवाराची भेट घेण्यासाठी विनोद तावडे या हॉटेलमध्ये आल्याचं सांगितलं जात होतं. मात्र, त्याचवेळी बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते क्षितिज ठाकूर यांच्यासमवेत हॉटेलमध्ये आले. या कार्यकर्त्यांकडून विनोद तावडेंकडून पैसे वाटप केल्याचा आरोप करण्यात आला. तसेच, कुणाला कसे पैसे वाटप झाले, याची माहिती असणारी डायरीही सापडल्याचा दावा करण्यात येत आहे.

**हितेंद्र ठाकूर यांचा मोठा दावा**

दरम्यान, खुद्द हितेंद्र ठाकूर यांनी विनोद तावडेंकडून आपल्याला फोन करण्यात आल्याचा दावा केला आहे. हितेंद्र ठाकूर यांनी एबीपी माझाला फ़्रोनवर दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये या दाव्याचा उल्लेख केला आहे. पाच कोटी रुपये घेऊन विनोद तावडे तिथे आले होते. दोन डायऱ्यादेखील तिथे मिळाल्या आहेत. कुठे कसं वाटप केलं वगैरे माहिती त्यात आहे. विनोद तावडे हे राष्ट्रीय सरचिटणीस आहेत. यांना एवढी अक्कल नाही की नेत्यांनी ४८ तास आधी इतर मतदारसंघ सोडायचे असतात. एवढा साधा नियम आहे. आज कार्यकर्त्यांची बैठक होती आणि काय चाललंय हे? आता पोलीस काय करतायत हे बघायचं आहेङ्क, असं हितेंद्र ठाकूर म्हणाले.

**भाजपावाल्यांनी सांगितलं तावडे पैसे घेऊन येत आहेत**

मला भाजपावाल्यांनी सांगितलं होतं की विनोद तावडे ५ कोटी रुपये घेऊन येतायत. मला वाटलं राष्ट्रीय नेते एवढं लहान काम करणार नाही. पण इथे पाहिलं तर पैसे वाटप चालू आहे, कार्यकर्तेही आहेत. या डायऱ्यांमध्ये नोंदी दिसत आहेत, असा दावा हितेंद्र ठाकूर यांनी केला आहे. प्रत्यक्ष पैसे वाटप होत असताना मी पाहिलेलं नाही. पण तिथे पैसे वाटले गेले आहेत. त्यांची डायरीही मिळाली आहे. सगळ्यांकडे पैसे पोहोचले आहेतङ्क, असा दावाही हितेंद्र ठाकूर यांनी केला आहे. ङ्गमी निवडणूक अधिकाऱ्यांशी बोललो आहे. ते पोहोचले की नाही माहिती नाही. विनोद तावडे म ला फ़्रोन करून विनंती करत आहेत की सोडवा यातून, माझी चूक झाली. माझ्या फोनवर त्यांचे २५ फोन आले आहेत. तुम्ही बघा, मी ते डिलिट करत नाही. ते म्हणत आहेत मला माफ करा, आता जाऊ द्याङ्क, असं हितेंद्र ठाकूर म्हणाले.

**भाजपानं आरोप फेटाळले**

दरम्यान, भारतीय जनता पक्षाकडून हे आरोप फेटाळण्यात आले आहेत. भाजपा नेते अतुल भातखळकर यांनी यासंदर्भात एबीपी माझावर प्रतिक्रिया दिली. ङ्गआरोप काहीही होऊ शकतात. पोलीस तिथे आहेत. महाराष्ट्रात पोलीस निवडणूक आयोगाच्या हाताखाली आहेत. पराभव समोर दिसू लागला म्हणून रडीचा डाव खेळण्याचा प्रयत्न आहे, असं भातखळकर म्हणाले.

# अमेरिकेत भारतीयांचा डंका! अमेरिकेच्या शिक्षण संस्थांमध्ये सध्या ३.३ लाखांहून अधिक भारतीय

नवी दिल्ली : अमेरिकेत सर्वाधिक विदेशी विद्यार्थी पाठवणारा देश म्हणून भारत गेल्या १५ वर्षांत प्रथमच समोर आला आहे. अमेरिकेच्या शिक्षण संस्थांमध्ये सध्या ३.३ लाखांहून अधिक भारतीय विद्यार्थी शिकत आहेत. सोमवारी प्रसिद्ध झालेल्या 'ओपन डोअर्स अहवाल २०२४'द्वारे ही माहिती अधोरेखित करण्यात आली.

**दोन वर्षांची तुलना–** शैक्षणिक वर्ष २०२२-२३मध्ये अमेरिकेत विदेशी विद्यार्थी पाठवण्यात चीन पहिल्या क्रमांकावर होता, तर भारत दुसऱ्या स्थानी. सध्याच्या 'ओपन डोअर्स अहवाला' नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये अमेरिकेत शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने उच्चांकी म्हणजे तीन लाख ३१ हजार ६०२ राहिली.

सन २०२२-२३च्या तुलनेत यात २३ टक्क्यांनी वाढ. या वर्षात ही संख्या दोन लाख ६८ हजार ९२३ इतकी होती. अमेरिकेत शिकणाऱ्या एकूण आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी २९ टक्के विद्यार्थी भारतातील. शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये अमेरिकेत सर्वाधिक आंतरराष्ट्र ीय विद्यार्थी पाठवणाऱ्या पहिल्या पाच देशांमध्ये भारताशिवाय चीन (२,७७,३९८), दक्षिण कोरिया (४३,१४९), कॅनडा (२८,९९८), तैवान (२३,१५७) यांचा समावेश.

भारत सलग दुसऱ्या वर्षी अमेरिकेत सर्वाधिक विदेशी पदवीधर (मास्टर्स आणि पीएचडी स्तर) पाठवणारा देशही ठरला. शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये अमेरिकेत प्रवेश घेणाऱ्या भारतीय पदवीधरांची संख्या गेल्या शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत १९ टक्क्यांनी वाढून एक लाख ९६ हजार ५६७वर पोहोचली. पदवीचे शिक्षण घेत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्याही १३ टक्क्यांनी वाढून ३६,०५३वर. बिगर पदवीधर विद्यार्थ्यांची संख्या २८ टक्क्यांनी कमी होऊन १,४२६वर.

**अहवालाचा हेतू –** हा अहवाल 'इन्स्टिट्यूट ऑफ़्र इंटरनॅशनल एज्युकेशन' ने (आयआयई) प्रसिद्ध केला आहे. आयआयई अमेरिकेतील विदेशी विद्यार्थ्यांचे वार्षिक सर्वेक्षण करते. या संस्थेची स्थापना सन १९१९ मध्ये झाली आहे. जगभरातील आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि शैक्षणिक आदान-प्रदानाच्या फ़्रायद्यांवर प्रकाश टाकण्याचा या संस्थेचा उद्देश आहे.

# बौद्ध, मातंग, चर्मकार, दलित, मुस्लिम, आदिवासी ओबीसी वंचित समाज एकत्र येऊन निवडणुकीत वंचितला सत्तेत आणूया - डॉ. भीमराव य आंबेडकर

## वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांसाठी डॉ. भीमराव य आंबेडकर यांचा पाच दिवसांचा विक्रमी प्रचार दौरा संपन्न





**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**मुंबई /प्रतिनिधी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेली,आंबेडकरी विचारांची बौद्ध समाजाची शिखर संघटना असलेली जीचे महाराष्ट्रा बरोबर संपूर्ण देशात संघटन जाळे आहे त्या दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा )

व समता सैनिक दलाच्या दि १०/११/२०२४ रोजीच्या डॉ आंबेडकर भवन, दादर मुंबई येथील राज्यस्तरीय मेळाव्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ भीमराव य आंबेडकर(ट्रस्टी /राष्ट्रीय कार्याध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष, समता सैनिक दल ) यांनी अँड प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला पाठिंबा दिला व वंचितच्या उमेदवरांना निवडून आणण्यासाठी प्रचार दौरा सुद्धा करण्याचा निर्णय घेतला. डॉ भीमराव य आंबेडकर,अँड एस के भंडारे आणि वंचित बहुजन आघाडीचे अशोक सोनोने, राजेंद्र पातोडे यांनी दोन दिवस चर्चा करून दि १४/११/२०२४ ते १८/११/२०२४ रोजीच्या डॉ भीमराव य आंबेडकर यांचा आणि त्यांच्या सोबत दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, मुंबई केंद्रीय कार्यालय प्रमुख व समता सैनिक दलाचे स्टाफ़्र ऑफिसर अँड एस के भंडारे यांच्या दौऱ्याची आखणी केली त्यानुसार, दि. १४/११/२०२४ रोजी जळगाव जामोदचे उमेदवार डॉ प्रविण पाटील(मराठा ) यांच्यासाठी शेगाव येथील अशोकनगर, जळगाव जाम ोद येथे आणि खामगांवचे उमेदवार देवराव (देवाभाऊ ) हिवराळे(बौद्ध ) यांच्यासाठी खामगांव येथे. बुलढाणाचे उमेदवार प्रशांत वाघोदे (बौद्ध ) यांच्यासाठी येथे दि. १५/११/२०२४ रोजी कळमनुरी मतदार संघाचे उम ेदवार डॉ. दिलीप म्हस्के नाईक (धनगर ) यांच्यासाठी बाळापूर, कळमनुरी येथे, गंगाखेडचे उमेदवार माजी आमदार सीताराम घनदाट(चर्मकार ) यांच्यासाठी डॉ आंबेडकर चौक,पूर्णा येथे.हिंगोलीचे उमेदवार प्रकाश थोरात यांच्यासाठी हिंगोली येथे, वाशीम-मंगळूरपीरच्या उमेदवार मेघाताई किरण डोंगरे यांच्यासाठी वाशीम येथे.

दि. १६/११/२०२४ रोजी नांदेड लोकसभा पोटनिवडणूकीचे उमेदवार अविनाश घोशीकर( ओबीसी ) आणि नांदेड उत्तरचे उमेदवार इंजिनियर प्रशांत इंगोले(बौद्ध ) यांच्यासाठी त्रिरत्न बुद्ध विहार डॉ आंबेडकर नगर,मायावती नगर,साकेत बुद्ध विहार राजनगर, तक्षशीला बुद्ध विहार स्वप्नजा गार्डन , झेंडा चौक येथे. आणि नांदेड दक्षिणचे उमेदवार फ़्रारुख अहमद (मुस्लिम ) यांच्यासाठी कवठे, बळीरामपूर, विष्णुपुरी, वाजेगाव, सिद्धार्थ नगर येथे.

दि. १७/११/२०२४ रोजी लोहा -कंदार चे उम ेदवार शिवा नरंगले(लिंगायत ) यांच्यासाठी क्रांती सूर्य बुद्ध विहार लोहा,यशवंत बुद्ध विहार माळाकोळी, डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा, माळेगाव यात्रा येथे. लातूर शहर उमेदवार विनोद खटके(बौद्ध) यांच्यासाठी लातूर येथील ६० फ़्रुटी रोड येथे मुस्लिम बांधावासोबत स्नेहमिलन, आंबेडकर पार्क , बरकत नगर आणि लातूर ग्रामीणचे उमेदवार डॉ विजय अजनीकर (बौद्ध ) यांच्यासाठी मुरुड येथे जाहीर सभा, बैठका, चर्चा इत्यादी करण्यात आले.

दि.१८/११/२०२४ रोजी पुणे कॉन्टेनमेंटचे उम ेदवार दिलीप आल्हाट यांच्यासाठी पुणे शहरातून डॉ भीमराव य आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली ताडीवाला रोड,कोरेगाव पार्क, भवानी पेठ, नाना पेठ, मुकुंद नगर, टिंबर मार्केट मंगळवार पेठ अशी भव्य टू व्हिलर बाईक रॅली काढण्या आली.

या डॉ भीमराव आंबेडकर यांच्या पाच दिवसाच्या प्रचार दौऱ्यात, राजकारण ही गुरुकिल्ली आहे. उद्याच्या येणाऱ्या सत्तेत आपण गेलो तरच आपले संविधान,आपले आरक्षण आणि आपले हक्क शाबूत राहू शकतात. भाजपची विचारसरणी ही सुरवातीपासूनच संविधान विरोधक आहे आणि काँग्रेस संविधान समर्थक असल्याचे सांगत आहे, परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच डउ, डढ आरक्षण मध्ये अबकड वर्गीकरण आणि क्रिमिलेअर लावण्याचा निर्णय दिला. त्याला विरोध न करता, कांग्रेस ने त्यांच्या राज्यात तो लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मा. न्यायालयाने दिलेला निर्णय संविधान विरोधी आहे.आंबेडकरी-वंचित समाजाचे नेते गुलाम कसे होतील, या दृष्टीने प्रस्थापित पक्ष प्रयत्न करतात. त्यामुळे बौद्ध,

मातंग,चर्मकार इत्यादी दलित, मुस्लिम,आदिवासी, ओबीसी असा वंचित समाज एकत्र येऊन निवडणुकीत वंचितला सत्तेत आणूया अशी स्थानिक प्रश्नाबरोबरच सारांशाने मते मांडली. त्यांच्या सोबत त्यात्या मतदार संघातील वरील उमेदवार दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा), समता सैनिक दल आणि वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.त्यात प्रामुख्याने अशोक सोनोने (वंचित पार्लमेन्ट्री बोर्ड, खामगाव), राजेंद्र पातोडे (प्रवक्ता,वंचित), भीमराव तायडे (राज्य संघटक बुलढाणाद्ध) , प्रा. बापू गायकवाड (राज्य संघटक, लातूर ), न्या.डॉ. यशवंत चावरे (राज्य संघटक व अध्यक्ष, नांदेड उत्तर जिल्हा) प्रा. सुरेश शेळके (निरीक्षक, वंचित, परभणी ),डी एस बारशिंगे (राज्य संघटक, लातूर), राजाराम साबळे, (मेजर जनरल, लातूर), आनंदा भेरजे (मेजर जनरल, परभणी ), एस एस वले (अध्यक्ष बुलढाणा), सिद्धार्थ भागत (अध्यक्ष, वाशीम जिल्हा ), पी एम वाघमारे (अध्यक्ष, नांदेड दक्षिण जिल्हा ), रविकिरण जोंधळे (सरचिटणीस, नांदेड उत्तर जिल्हा ), अशोक कांबळे (अध्यक्ष, परभणी जिल्हा ), एम एम बलांडे (अध्यक्ष, लातूर जिल्हा ), सुभाष भिसे (अध्यक्ष, हिंगोली जिल्हा), राजरतन थोरात (सरचिटणीस,पुणे पश्चिम जिल्हा) आणि त्यांचे सहकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# बौद्ध धम्म हा सर्वंगिक बदल घडवणारी क्रांती - भदंत ज्ञानज्योती महास्थविर



**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**परभणी/प्रतिनिधी**

समतावादाचा पुरस्कर्ता बौद्ध धम्म आहे. जो वर्ग विहीन दुःख विहीन आहे. याच मार्गाने माणूस घडवला जातो. तो बौद्ध धम्म सर्वांगिक बदल घडवणारी क्रांती असल्याचे प्रतिपादन पूज्य भदंत ज्ञानज्योती महस्थवीर चंद्रपूर यांनी केले.

कार्तिक पौर्णिमेच्या निमित्ताने नागभूमी धम्मगिरी मृगदायवन राणीसावरगाव येथे भिक्खू नाग ज्योती यांच्या नवव्या वर्षा समारोप कार्यक्रम प्रसंगी पूज्य भदंत ज्ञानज्योती महास्थवीर यांनी धम्मदेशना झाली. समाज बदलाचा हा धम्म समाजातील शिक्षित वर्गाने आपल्या खांद्यावर घेउन सदधम्माचा वारसा पूढे न्यावा तरच महापुरुषांना अपेक्षित समता मुलक समाज निर्माण होईल, असे ही ते म्हणाले.प्रारंभी नाग भूमी धम्मगिरी मृदायवनचे संकल्पक डॉ परमेश्वर साळवे यांनी प्रास्ताविक केले. विचार मंचावर भदंत धम्मरक्षित (आग्रा), भिक्खू नाग ज्योती, भिक्खू प्रज्ञारत्न शाक्यवंश (आचार्य प्रज्ञा)व भिक्खू संघ उपस्थीत होते. या वेळी डॉ संघमित्रा साळवे, राजेंद्र कांबळे, उत्तम कांबळे, सुनील पवार, गोपीनाथ कांबळे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. श्रद्धावान धर्म उपासक उपासिका धम्म श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी बाळासाहेब जंगले नवनाथ साळवे उमाकांत शेंडगे सखाराम मस्के शंकर साळवे आदींनी परिश्रम घेतले.

## स्टायलिश महाराष्ट्र



**स्टायलिश काय फक्त उत्तर भारतातील निवडणूक अधिकारीच असतात का ?महाराष्ट्रही काही कमी नाही. हे आहेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कार्यरत असलेले उज्वलकुमार म्हस्के ! गंगापूर विधानसभा मतदारसंघात निवडणूक अधिकारी क्रमांक.१ म्हणून बूथ वर निवडणूक साहित्यासह जातांना दिसत आहेत !**

# एक मत परिवर्तन घडवू शकते

**देशात** ९३ टक्के असंघटीत कामगार मजूर आहेत.ती सर्व बहुजन,मागासवर्गीय आहेत आणि सात टक्के संघटीत कामगार मजूर आहेत.ते शिक्षणात आरक्षण मिळाल्यामुळे उच्च शिक्षित झाले. त्यामुळे त्यांना नोकरीत पण आरक्षण मिळाले. त्यामुळेच ते आर्थिकदृष्ट्या उच्च वर्गीय होऊन ब्लॉक मध्ये लॉक झाले.यांच्यावर साडेतीन टक्के लोक संख्या असणाऱ्या समाजाची लोक सर्व बाजूने सर्व क्षेत्रात अधिकार गाजवितात.माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नव्हता तेव्हा मताचा अधिकार कसा असणार?.आज माणूस म्हणून जगण्याचा आणि मतदानाचा अधिकार आहे.तरी शेणातील किडे शेणात राहणे पंसद करतात असे खेदाने म्हणावे लिहावे लागते.कारण काही माणस असणारी किड्या सारखी आजही जगतात. त्यांना मताची किंमत कळत नाही.असे कसे म्हणता येईल?. पोटासाठी देह विक्री करनारी वेश्या.आणि पैशासाठी 'मत' विकणारा भ्रष्ट मतदार यात तुलना करणे म्हणजे वेश्येचाच अपमान ठरेल,कारण ती दररोज शरीर विकुन पोट भरते,पण स्वाभिमान,आत्मा विकत नाही.दारू,बिर्यानी,पैसा करीता मत विकनारा मतदार मात्र आपले सर्वस्व स्वाभिमान, आत्मा व सन्मान विकुन कायम लाचार बानतो स्वताही आणि समाजालाही लाचार ठरवतो.

विज्ञानाने खुप प्रगती केली,आता चोरून लपवून कोणते ही काम,व्यवहार केला तर तो उजेडात येण्या करीता चॅनल,प्रिंट मिडियाची गरज नाही. सोशल मिडिया काही तासात त्याला सार्वजनिक करून टाकते. म्हणुनच लोकसभा निवडणुकी नंतर विधानसभा निवडणूका लक्ष्य २०२४ ने अनेक रस्ते,चौक,वार्ड,विभाग सोशल मिडीया ग्रुपने रंगु लागलेत.लोकशाही ने सामान्य माणसाच्या हातात परिवर्तनाच मोठं अस्त्र दिलं.पण त्या अस्त्राचच वस्त्रहरण होत आहे.गल्ली बोळातल्या मतांवर हक्क सांगणारी 'टोळकी' 'ईच्छुकांच्या' दरवाजावर दस्तक देत फिरू लागलीत.या स्पर्धेत कुणीच मागे नाही.त्यात राजकीय मान्यता प्राप्त पक्षाची युती, आघाडी तुटल्या मुळे राजकारणातील घरांण्याची प्रतिष्ठा पणाला लागली.त्यामुळे झोपडपट्ट्यामध्ये पैसे,देवदर्शन,साड्यावाटप, दारूच्या मटनाच्या पार्ट्या,मध्यमवर्गीयांच्या सोसायट्यांमधे ब्लॉक,फरशा,रंगकाम, हलदी कुंकु,होम मिनीस्टर..उच्च मध्यमवर्गीयांना व श्रीमंतांना 'मानपान', गळाभेट, मंडळांना वर्गण्या,गणपतीला चांदी,सोने,मंदीराला कळस,असं बरच काही दान धर्मात मिळत आहे. कारण डोळ्या समोर फक्त निवडणुका आहेत,त्यातला सर्वात मोठा करोडपती हा फाटक गरीब मतदार आहे,त्यांचे एक मत ही सर्व समीकरण बदलू शकते,म्हणुन त्यांना सांबाळणारा कार्यकर्ता म्हणून आलेल्या टोळक्यांना दोन पाच हजार रुपये देऊन खुश ठेवावे लागते,हीच तर खरी लोकशाहीची थट्टा,विटंबना आहे,उमेदवारांच्या खैरातीवर जोगवा मागणारा भ्रष्ट मतदार!,देशाचा खरा गद्दार झाला आहे. त्यांचा लाचारी मुळे नालायक,भ्रष्ट,चरित्रहीन लायक बनून लोकप्रिय लोकप्रतिनिधि बनत आहेत.

आपण नेहमी अतिरेक्यांना का दोष देता.त्यांना हा देश संपवायचाय तो स्वत:च्या जीवाचे 'बलीदान' देऊन. आणि तुम्ही तो संपवताय,आणि तेही स्वत:च्या स्वार्थासाठी, व्यक्तिगत फायद्यासाठी?.अतिरेकी तुमच्या पेक्षा इमानदार नाही का?.पैसा घेऊन मतदान करता?.काय म्हणावे तुम्हाला?. वेश्या सुद्धा शरीर विकतात ते पोटासाठी!. तुम्ही तर देश विकता,वर सांगता उमेदवार कुठ ५ वर्षे भेटतो आम्हाला?.अरे भेटत नसेल तर बदल ना त्याला मतदानातुन !. पैसे का मागता. मतदानाच्या दिवशी तर पैसे मिळत नाही तोपर्यंत काही मतदार मतदान करायलाही बाहेर पडत नाही. हे देशातील ९३ असंघटीत कष्टकरी मजूर कामगारांची मनस्थिति आहे.असंघटित कामगार म्हणून तुझी आणि तुझ्या देशाची ही जी अवस्था झाली त्याला तूच जबाबदार आहे. दुसरे कोणी नाही म्हणूनच हे उमेदवार एकदा निवडून आले की तुला कुत्र्यासारखी किंमत देतात आणि त्याचे तुला काहीच कसे वाटत नाही ?.

सुज्ञ व सजग मतदारांची संख्या ज्या दिवशी ७० टक्के होईल तेव्हाच अशा भ्रष्ट मतदारांचा पाडाव शक्य आहे. मतदारांच्या समुहाच राजकिय,सामाजिक,नैतिक प्रतिनीधीत्व जरूर मान्य करावं. पण उमेदवारांचा पैसा मतदारां पर्यंत पोहचवण्याची दलाली करणा-यांच्या पार्श्वभागावर ज्या दिवशी मतदार लाथ घालेल,त्या दिवशी देशात लोकशाही आहे हे मान्य करू व त्याच दिवशी मतदार हा खरा राजा असेल.अन्यथा तो लाचार गुलाम समजल्या जाणार आहे.

'कायदेमंडळावर योग्य उमेदवार निवडून देण्यासाठी आपणास मताचा अधिकार आहे.हा अधिकार फार महत्त्वाचा व मोठा आहे.तेव्हा आपल्या मताची बहुमोल शक्ती भलत्याच ठिकाणी वाया जाता नये.सध्या आपल्या देशात सधन लोक मते विकत घेतात,पण मत हि विकण्याची वस्तू नाही.ती आपली संरक्षणाची साधनशक्ती आहे.मत विकणे हा गुन्हा तर आहेच,पण तो आत्मघातकीपणा देखील आहे. मते विकून लायक नसलेल्या उमेदवारांची खोगीरभरती कायदेमंडळावर केल्याने देशाचे अपरिमित नुकसान होऊन राष्ट्र अधोगतीस जाते. स्वता: नालायक व अपात्र असून पैशाच्या जोरावर विधिमंडळात जाऊ इच्छिणारे काही लोक तुम्हाला द्रव्याचे अमिष दाखवतील. अशा कोणत्याही मोहास तुम्ही बळी पडू नका. मोहास बळी पडलात तर तुम्ही आपल्या पायावर पर्यायाने समाजाच्या पायावर धोंडा मारून घ्याल हि धोक्याची सूचना मी आज सर्वांना देत आहे. मते विकत मागणाऱ्या माणसाला समाजाचा पाठिंबा नसतो, म्हणून तर तो द्रव्याच्या बळावर आपली लायकी प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करतो. अशा उमेद्वाराकडून समाजहिताची व राष्ट्रहिताची कार्ये होत नाहीत.पैसेवाला जर कायदे मंडळात गेला तर तो पैसेवाल्या लोकांचे हितसंरक्षण करील व तो सर्वसामान्य व गरिबांच्या हिताच्या आड येईल.म्हणून मत विकण्याचे पाप तुम्ही करू नका व आपली दिशाभूल करून घेऊ नका !!' संदर्भ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ (१) पान नंबर ४६६)

महामानवाचे बोल असंघटित कष्टकरी मजूर,शेतमजूर,नाका कामगार,घरकामगार, हाताने कष्टकरणारा एकूण ९३ टक्के कामगार हा मतदार म्हणून राजकीय परिवर्तन करू शकतो.पण तो दररोजच्या मिळणाऱ्या मजुरी सारखी मजुरी मतदानच्या दिवशी मत विकुन मिळवणार असेल तर त्याची एका दिवसाची मजुरी किती होते ते जरा तपासून बघा?.समजा एका मताचे १००० रूपये ह्य १८२५ दिवस (५ वर्ष) = ०.५४ रूपये एका दिवसाचे, जर कोणी एका मताचे २००० रूपये ह्य १८२५ दिवस (५ वर्ष) = १.०९ रूपये एका दिवसाचे.एका मताचे ३००० रूपये ह्य १८२५ दिवस (५ वर्ष) = १.६४ रुपये एका दिवसाचे,एका मताचे ४००० रूपये ह्य१८२५ दिवस (५ वर्ष) = २.१९ रुपये एका दिवसाचे,एका मताचे ५००० रूपये ह्य१८२५ दिवस (५ वर्ष) = २.७३ रुपये एका दिवसाचे होतात. हे एका मतदारांचे मतदान केल्यामुळे पाच वर्षाचे उत्पन्न झाले. तेच जर एका उमेदवाराचे पाच वर्षाचे वार्षिक उत्पन्न पाहाल तर डोके ठिकण्यावर आल्या शिवाय राहणार नाही. मत विकुन आपली आणि आपल्या कुटुंबाची किंमत कवडीमोल करू नका?.चला लोकशाही मजबुत करूया...योग्य उमेदवाराला मतदान करूया.कष्टकरी कामगारांच्या बाजूने उभा राहणारा.चरित्रवान,सामाजिक बांधिलकी ठेऊन वागणार, समाज हित,देश हिताला प्राधान्य देणारा उमेदवार त्यालाच मतदान करा. तो निवडून येणार नसेल तरी तुमच्या न्याय हक्क,अधिकारासाठी विचारधारेसाठी जनआंदोलन करणारा असला पाहिजे त्यालाच आपले बहुमूल्य मत दान करा,कारण एक मत परिवर्तन घडवू शकते हे लक्षात ठेवा.

जय संविधान!.
जय महाराष्ट्र!!. जय भारत!!!.
सागर रामभाऊ तायडे-
९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.

# इप्टाची दोन दिवसीय परिषद उत्साहात संपन्न

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

येथे इंडियन पेपर अँड पल्प टेक्निकल असोसिएशन (इप्टा) तर्फे छत्रपती संभाजीनगर येथील हयात प्लेस हॉटेलमध्ये १७ आणि १८ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. ही परिषद मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यामध्ये ३०० पेक्षा अधिक तज्ञ आणि २२ संशोधन पेपर सादर झाले, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष शेखर देसरडा यांनी दिली.

ते म्हणाले की, या परिषदेच्या निमित्ताने प्लॅस्टिकला शाश्वत पर्याय म्हणून कागदाच्या विविध उपयोजनांवर चर्चा करण्यासाठी ३०० हून अधिक तज्ञ एकत्र आले. सहभागींनी कागदाच्या नाविन्यपूर्ण वापरांचा शोध लावला, जसे की तात्पुरत्या आराम आश्रयांसाठी आपत्कालीन बेड तयार करणे. हे विशेषत: कोविड १९ महामारी सारख्या परिस्थितीत उपयुक्त आहे, जेथे तात्पुरत्या वैद्यकीय सुविधांच्या मागणीत वाढ झाली होती. हा दृष्टिकोन लाकडावरील अवलंबित्व कमी करतो आणि पर्यावरणीय प्रभाव कमी करतो. कागदावर आधारित उत्पादनांचे गुणधर्म वाढविण्यासाठी कागद आणि नालीदार उद्योगातील तज्ञांनी हनीकॉम्ब रचनांचा अवलंब करण्यावर विचारांची देवाणघेवाण केली. या सहकार्याचे उद्दिष्ट नवसंकल्पना आणि शाश्वत पद्धतींना चालना देणे आहे. परिषदेच्या समारोपप्रसंगी चार वक्त्यांना सर्वोत्कृष्ट पेपर पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये सेंट्रल पल्प अँड पेपर रिसर्च इन्स्टिट्यूटचे एक शास्त्रज्ञ आणि तीन उद्योग व्यावसायिकांचा समावेश होता. परिषदेच्या समारोपप्रसंगी चार वक्त्यांना सर्वोत्कृष्ट पेपर पुरस्काराने गौरविण्यात आले.



यामध्ये सेंट्रल पल्प अँड पेपर रिसर्च इन्स्टिट्यूटचे एक शास्त्रज्ञ आणि तीन उद्योग व्यावसायिकांचा समावेश होता.

यामध्ये पॅकेजिंग उद्योगांची उदयोन्मुख मागणी पूर्ण करण्यासाठी विविध ग्रेडचे पेपर तयार करणे या विषयावर भारत आणि परदेशातील प्रख्यात तंत्रज्ञ, अभियंते, यंत्रसामग्री पुरवठादार आणि संस्था संशोधन सादर झाले. त्याचप्रमाणे एकल वापराच्या प्लास्टिकला कागदाद्वारे बदलण्यासाठी उपाययोजना या विषयावर देखील चर्चा करण्यात आली.

या परिषदेच्या यशस्वीतेसाठी पवन खेतान (अध्यक्ष इप्टा तथा सी एम डी काऊंटम पेपर मिल्स- पंजाब), एस व्ही आर कृष्णन (उपाध्यक्ष इप्टा तथा कार्यकारी संचालक - खन्ना पेपर मिल्स, अमृतसर), एम.के. गोयल (मानद सरचिटणीस, इप्टा), शेखर देसरडा (कार्यक्रम अध्यक्ष तथा सीएमडी - पॅरासन ग्लोबल) आणि प्रकाश राठी यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्यांनी परिश्रम घेतले.

# 'उद्योग आणि कंपन्यानी राज्याबाहेर का जाऊ नये ?'



**उद्योग** आणि कंपन्या राज्याबाहेर गेल्या की आपण लगेच त्याचा दोष इतरांवर टाकायला सुरुवात करतो. अर्थातंच 'मोदींनी गुजरातला पळविले अशा बोंबा मारल्या जातात. पण खऱ्या अर्थाने आपण कधी आत्मपरीक्षण केलं आहे का की उद्योग, कंपन्या राज्याबाहेर का जातात? त्यांना इथेच स्थिर राहून आपला व्यवसाय वाढवायचा नाही का? का कुठल्याही उद्योजकाला त्याच्या कर्मचाऱ्यांना सोडून, पूर्ण यंत्रणा हलवून दुसऱ्या राज्यात जावेसे वाटेल?

खरंच आपल्याकडे 'वर्क कल्चर' उरलंय का ?

आपल्या राज्यातील वातावरणाचा विचार केला तर उत्तर अगदी स्पष्ट आहे. आपल्या गल्ली-बोळातील पुढाऱ्यांचे, विघ्नसंतोषी पक्षांच्या कार्यकर्त्यांचे वागणे या सगळ्याला जबाबदार आहे. ज्यांना स्वतःचा शेंबूड नीट पुसता येत नाही असे तीनपाट गाबडे पण कंपन्या चालवणाऱ्या उद्योजकांना नडायचं काम मात्र मोठ्या डेरिंगने करतात. खंडण्या मागणे, कुठे कंपनीच्या मालकाला शिव्या घालणे, तर कुठे मॅनेजरला मारहाण करणे व त्याचे व्हिडिओ शूटिंग सोशल मीडिया वर टाकून आपण किती महान काम केल्यासारखं वंगाळवाणं प्रदर्शन करणे, कामगारांना भडकावून संप घडवून आणणे, हे सगळं आपण सर्रास पाहतो. या अशा विघ्नसंतोषी भूमिपुत्रांच्या कारवायांमुळे उद्योजकांना इथं काम करणं कठीण जात आहे. तरीही आपण निर्लज्जपणे त्यांच्याकडून अपेक्षा ठेवतो की त्यांनी इथेच राहून आपल्या लोकांना रोजगार द्यावा.

विशेष बाब म्हणजे ज्या कंपन्यांचे मालक मराठी आडनावाचे आहेत त्यांचे सर्रास कामगार हे युपी बिहारी



**- डॉ दिनेश ललवाणी**
**राजकीय नेतृत्व प्रशिक्षक आणि रणनीतीकार**
**लीड इंडिया - ८४३२२६९३६९**

दिसतील याउलट मारवाडी आडनावाचे मालक असणाऱ्या कंपन्यांमध्ये मॅनेजर पासून इतर कामगारांपर्यंत बहुदा मराठी कर्मचारी असतील हे मी इथे खात्रीने सांगतो.

आपल्या राज्यातील नागरिक म्हणून आपणही याला तितकेच जबाबदार आहोत. आपण कंपन्यांच्या मालकांकडे फक्त पैशाच्या यंत्रांसारखं पाहतो. त्यांच्या अडचणी, गरजा, आणि समस्या याकडे लक्षच देत नाहीत.

याउलट, त्या कंपन्यांना गृहित धरतो की त्यांनी आपल्या राज्यातच राहायला हवं. पण जेव्हा इथे कामकाजासाठी अनुकूल वातावरणच उरत नाही, उद्योजकांना स्वतःची सुरक्षितता वाटत नाही, तेव्हा त्यांनी सोयी सुविधा मिळत असणाऱ्या दुसऱ्या राज्यात जाण्यात काय गैर आहे?

राज्यकर्त्यांच्या भूमिकेवर बोलायचं झालं, तर त्यांनीही याला मोठ्या प्रमाणात हातभार लावलेला आहे. उद्योगधंद्यांसाठी दीर्घकालीन, शाश्वत धोरणं तयार करण्याऐवजी, राजकारणात अडकून त्यांनी फक्त मतांसाठी, आंदोलनांसाठी किंवा विशिष्ट गटांच्या दबावाखालीच निर्णय घेतलेले असून त्यातून निर्माण झालेला गोंधळ आणि अस्थिरता उद्योजकांना कायम दूर ढकलत राहिलेली आहे.

आता वेळ आली आहे की आपण आत्मपरीक्षण करण्याची. आपल्याला खरंच उद्योगधंदे हवे आहेत का ? रोजगार हवा आहे का? जर हवा असेल, तर त्या दिशेने बदल करणं आवश्यक आहे.

युपी - बिहारी हाकला किंवा परप्रांतीय हाकला अशी गुजरातमधून बातमी आलेली कधी ऐकली नाही. म्हणून .. उद्योजकांना आदर देणं, त्यांना काम करण्यासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देणं, त्यांच्यावर अवाजवी दबाव टाकणं थांबवणं, आणि त्या विघ्नसंतोषी मानसिकतेला चाप लावणं गरजेचं आहे.

उद्योगधंदे टिकून राहतील तेव्हा राज्याचा विकास होईल. अन्यथा, केवळ गुजरातच्या नावाने बोंब मारत राहण्याने काहीही साध्य होणार नाही.

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर दुरक्षेत्र पोलिस चौकी कुलूप बंद

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**खुलताबाद /प्रतिनिधी**

तालुक्यातील तथा पोलिस ठाण्याअंतर्गत बाजार सावंगी येथे दुर क्षेत्र पोलिस चौकी कार्यरत असून ३०-३२ गाव खेड्यांचे मदत सुरक्षा रक्षक कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी चौकीत मुख्य जमादार सह पाच सहा पोलिस कर्मचारी येथे कार्यरत आहे परंतु ऐन निवडणुकांच्या तोंडावर चौकी कुलूपबंद विना कर्मचारी पडून आहे.


सध्या गंगापूर/खुलताबाद विधानसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. १८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यात दोन तीन उमेदवारात मोठी स्पर्धा आहे. तुल्यबळ प्रतिस्पर्धी असल्याने वातावरण स्फोटक आहे. गावा गावात कार्यकर्ते उमेदवाराला घेऊन उत्साह जोश तथा पक्ष सत्तेचा जोश असल्याने वातावरण स्फोटक बनुन आहे.पक्ष तर पक्ष अपक्ष उमेदवारामागे सभेला गर्दी उसळलेली पाहून खावु मारु गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. तर ठिकठिकाणी हॉटेल ढाबे येथे फुल्ल गर्दी तर दारुचा सुळसुळाट दिसून येत आहे. एकुण गोंधळाची परिस्थिती असताना येथील दुर क्षेत्र पोलिस चौकी कुलूप बंद स्थितीत असल्याने व चौकीत मुख्य जमादार सह पाच सहा पोलिस कर्मचारी कार्यरत असतांना कुणीच उपस्थित नसल्याने नागरिकांतून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## वंचितला हरविण्यासाठी महायुती, महाविकास आघाडी आणि अपक्ष कसे एकत्र येतात त्याचे हे उदाहरण बघा

**निळे प्रतिक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी विजयाच्या दिशेने आगे कूच करत असताना वंचितला हरविण्यासाठी महायुती, महाविकास आघाडी आणि अपक्ष कसे एकत्र येतात त्याचे हे उदाहरण बघा. दलित, आदिवासी, ओबीसी आणि अल्पसंख्यांक समुदायाला फक्त वोटबँक म्हणून वापरणाऱ्या पक्षाची आणि त्यांच्या नेत्यांची नीच मानसिकता बघा. या समुदायची मतं हवीत पण नेतृत्व नको. राज्याच्या अनेक मतदारसंघात वंचितचे उमेदवार आघाडीवर आहेत. त्यांना हरवून सत्ता मराठा खाणावळीच्या हातात ठेवण्यासाठी असे प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे बहुजन समाजाने आता जागं होऊन आपली एकजूट कायम ठेवावी आणि आणि ही मराठा खानावळीची घराणेशाही ची सत्ता उलथवून लावावी.

सर्व दलित, आदिवासी, बौद्ध, ओबीसी, मुस्लिम मतदारांनी फक्त वंचित बहुजन आघाडीलाच मतदान करा!



हिंदुत्वाच्या उमेदवारास
**जाहिर पाठींबा**

**मी, दिलीप व्यंकटराव कंदकुर्ते** पूर्वी काँग्रेस पक्षाचा नगरसेवक, सभापती राहिलोय व राजकिय भूमिकेतून समाजहिताची अनेक कामे केली आहेत. याच कामाच्या शिदोरीवर यापूर्वीही दोनदा नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून पक्षाच्या विरोधात जावून अपक्ष म्हणून आमदारकीची निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला आणि पराभूत झालो आहे.

मागील निवडणूकीत माझ्या अपक्ष उभा राहिल्याने हिंदुत्वाच्या विचारसणीची मते फुटल्यामूळे दक्षिण नांदेडमध्ये काँग्रेस पक्षाचा उमेदवार जिंकून आला. आणि तिच परिस्थिती यावेळेसही दिसत आहे. यावेळेस मतविभाजन झाले तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार श्री फारुख अहेमद हे निवडून येण्याचीच शक्यता आहे. त्यामूळे हिंदुत्वाचा पराभव टाळण्यासाठी मी या निवडणूकीतून माघार घेत आहे. आणि माझ्या हिंदुत्वाच्या उमेदवारास पाठींबा देत आहे.

चला, नांदेड दक्षिणच्या सर्वांगिण विकासासाठी हिंदुत्वाची विचारसरणी असणाऱ्या उमेदवाराच्या पाठीशी आपण भक्कमपणे उभे राहून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करू या...

आपला नम्र,
**दिलीप व्यंकटराव कंदकुर्ते**
अपक्ष उमेदवार, नांदेड दक्षिण

## मतदान व मतमोजणीच्या दिवशीचे आठवडी बाजार बंद

**छत्रपती संभाजीनगर,** - विधानसभा निवडणूक २०२४ साठी बुधवार दि.२० रोजी मतदान व दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे. याकालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी तसेच मतदान निर्भय निष्पक्ष व मतमोजणी शांततेत पार पडावी यासाठी बुधवार दि.२० रोजी व शनिवार दि.२३ रोजी असणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी निर्गमित केले आहेत. या दिवशी भरणारे बाजार हे अन्य दिवशी भरवावे असेही आदेशात नमूद केले आहे.